Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education,
Pune S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए.,प्लॉट.नं.१७८,१७९, ई
बालभारती शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807 I
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक रा.मं./परीक्षा-८/२१५३
पुणे – ४११ ००४
दिनांक –२०/०५/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

विषय – उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा जून–जुलै २०२६ अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याच्या तारखांबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, जून–जुलै २०२६ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.२०/०५/२०२६ रोजी संपुष्टात येणार आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची विलंब शुल्काची निर्धारित मुदत संपल्यानंतर अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व इतर तपशीलवार माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अतिविलंब शुल्क मुदत (रू.५०/– प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क मुदत (रू.१००/–प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|
| गुरूवार दि. २१/०५/२०२६<br>ते<br>शनिवार दि. ३०/०५/२०२६ | रविवार दि. ३१/०५/२०२६<br>ते<br>मंगळवार दि. ०९/०६/२०२६ |

१.सदर आवेदनपत्रे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पद्धतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्रे online भरलेल्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्क online चलन तयार करून चलनावर नमुद ICICI बँकेच्या Virtul Acount मध्ये कोणत्याही बँकेद्वारे त्याच दिवशी online पद्धतीने जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application Status मध्ये Send to board व Payment Status मध्ये Paid असा बदल झाला आहे का? याची खातरजमा करावी. असे Status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राहय धरण्यात येतील. विभागीय मंडळाने अशी आवेदनपत्रे व चलने स्विकारून व त्याचे Status ची खात्री करून पुढील कार्यवाही करावी. कनिष्ठ

कृ.मा.प.

महाविद्यालयाने चलन उशीरा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबधित विलंबाची यथायोग्य फी संबधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून घेण्यात यावी.

२.त्याचप्रमाणे आवेदनपत्रामध्ये नाव/जन्मतारीख/विषय/माध्यम याबाबत Prilist च्या दुरूस्त्या राहिलेल्या असल्यास प्रचलित पद्धतीने (Offline) विहित शुल्कासह जमा करुन घेणेबाबत उच्चमाध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.

३.प्रचलित पद्धतीप्रमाणे विशेष अतिविलंबासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबधित माध्यमिक शाळाप्रमुखांना पाठविण्यात यावे. तसेच पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलिंब/विशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत. दि. ०९/०६/२०२६ नंतर कोणत्याही विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे स्विकारू नयेत.

४. मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्यांचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्याकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

Mali

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

क्र. कोविमं/उ.मा./परीक्षा/1783
दिनांक :-२१/०५/२०२६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा- सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षा जून-जुलै २०२६ अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याच्या तारखांबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) जून-जुलै २०२६ परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे भरणेबाबत उपरोक्त पत्रानुसार कार्यवाही करावी.

(अनुराधा म्हेत्रे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षा जून–जुलै २०२६
फक्त कार्यालयीन वापराकरिता
पुनर्परिक्षार्थी,नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी,श्रेणीसुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ट विद्यार्थी यांचेकरिता शुल्काचा तक्ता

| अतिविलंब शुल्क | | | विशेष अतिविलंब शुल्क | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु.५०/– | | | प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु.१००/– | | |
| अ.क्र. | दिनांक | रक्कम | अ.क्र. | दिनांक | रक्कम |
| १ | २१/०५/२०२६ | ५०/– | ११ | ३१/०५/२०२६ | ६००/– |
| २ | २२/०५/२०२६ | १००/– | १२ | ०१/०६/२०२६ | ७००/ |
| ३ | २३/०५/२०२६ | १५०/– | १३ | ०२/०६/२०२६ | ८००/– |
| ४ | २४/०५/२०२६ | २००/– | १४ | ०३/०६/२०२६ | ९००/– |
| ५ | २५/०५/२०२६ | २५०/– | १५ | ०४/०६/२०२६ | १०००/– |
| ६ | २६/०५/२०२६ | ३००/– | १६ | ०५/०६/२०२६ | ११००/– |
| ७ | २७/०५/२०२६ | ३५०/– | १७ | ०६/०६/२०२६ | १२००/– |
| ८ | २८/०५/२०२६ | ४००/– | १८ | ०७/०६/२०२६ | १३००/– |
| ९ | २९/०५/२०२६ | ४५०/– | २९ | ०८/०६/२०२६ | १४००/– |
| १० | ३०/०५/२०२६ | ५००/– | २० | ०९/०६/२०२६ | १५००/– |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

Mali
(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.